International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 January – February 2023

# औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती

**श्रीमती विद्या विलास मस्के**

*जनता माध्यमिक व कला वाणिज्य व विज्ञान,*

*ज्युनिअर कॉलेज, हुपरी*

***Corresponding Author - श्रीमती विद्या विलास मस्के***

**DOI - 10.5281/zenodo.7638097**

**प्रस्तावना :**

भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृती अस्तित्त्वात आहे. पुरुषांना भारतीय समाजव्यवस्थेत श्रेष्ठ स्थान व स्त्रीला कनिष्ठ स्थान आहे. आजच्या काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रसार यामुळे मोठ्या प्रमाणात स्त्रियां शिक्षित होत आहेत. त्या देखील आजच्या काळात पुरुषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. औद्योगिक क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात महिला 'कामगार काम करतात. ग्रामीण भागात देखील उद्योगधंद्यात वाढ होत असून महिलांना देखील रोजगारांची संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये बदल होताना आढळत आहे. पूर्वीचे समाजातील महिलांचे स्थान आज त्यांच्या कार्यामुळे उंचावत आहेत. त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारत असल्याचे आढळत आहे.

भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृतीचे अस्तित्त्व पूर्वापार चाल आलेले आहे. भारताची ऐतिहासिक परंपरा सातत्याने पितृसत्तेच्या अधिन आहे हे सत्य नाकारता येत नाही. अगदी आजचे एकविसावे शतक देखील याला अपवाद नाही. कारण १९ व्या शतकापर्यंत सामाजिक क्षेत्रातील राजकीय व आर्थिक दृष्ट्या स्त्रियांचा दर्जा प्रचंड खालावला गेला. परंतु २१ वे शतक खऱ्या अर्थाने आधुनिकतेची पहाट घेऊन आले होते. समाजामध्ये स्त्रीचे स्थान कसे आहे यावरून त्या समाजाची सांस्कृतिक महत्त्व आजमावले जाते. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री वर्ग सतत उपेक्षित राहिलेला आहे. वैदिक काळापासून ते आजतागायत स्त्रियांच्या स्थानात सतत चढ-उतार बदल होत आले आहेत. कधी तिला देवी मानून तिची आराधना, पूजा केली तर कधी तिला दासी मानून तिची अवहेलना केली. काही मूठभर स्त्रियांना समाजात समानता व दर्जा प्राप्त झालेला दिसला तरी एकंदरीत सर्वच स्त्रियांना तो मिळाला नाही.' आधुनिक काळामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर बनत आहे. अर्थार्जनामुळे त्यांच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्यांच्या परावलंबी जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात

परिवर्तन झाले आहे. महिला सक्षमिकरणामुळे त्यांचा दर्जा उंचावत आहे.'

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांची सामाजिक स्थिती अभ्यासणे.
२. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांची आर्थिक स्थिती अभ्यासणे.
३. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :**

१. औद्योगिक क्षेत्रात काम करीत असल्यापासून महिला कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने "कागल व हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील २१६ महिला कामगारांची अभ्यासासाठी निवड केली आहे. नमुना निवड करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. मुलाखत अनुसूचीद्वारे प्राथमिक तथ्य संकलन करून माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच तथ्य विश्वनेषणासाठी एस.पी.एस.एस. (spss) सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला आहे."

**महिला कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती :**

स्त्रिया या समाजाचा अविभाज्य भाग आहे आणि श्री विकास हा समाजाचा विकासाचा मुख्य मार्ग आहे. स्त्रियांच्या दर्जा उंचावण्याचा प्रमुख मार्ग म्हणजे स्त्री शिक्षणावर भर आणि स्त्रियांना अर्थाजनाचे साधन प्राप्त होणे आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान असणे महत्वाचे आहे. भारतीय समाजव्यवस्थेत सर्वच क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते, त्यामुळे त्या आजवर संधीवंचित, सत्तावंचित व प्रतिष्ठावंचित राहिलेला दिसून येतात. स्वातंत्र्यानंतर त्यामध्ये काही प्रमाणात बदल झालेला दिसतो आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरणाचा परिणाम म्हणून विविध प्रकारचे उद्योग, व्यवसाय, कारखाने निर्माण झालेले आहेत. या सर्वांत केवळ पुरुषच कामगार म्हणून काम करतात असे नाही तर त्याच प्रमाणात स्त्रियादेखील अर्थार्जनासाठी बाहेर पडलेल्या दिसून येतात. '

त्यामुळे महिला कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी संशोधिकेने महिला कामगारांचे वय, त्यांची वैवाहिक स्थिती, त्यांची शैक्षणिक पात्रता, कामाचे स्वरूप, कुटुंबाचा प्रकार, तसेच त्यांचे नोकरी करण्याचे कारण, त्यांचे मासिक उत्पन्न, पैशाची बचत, त्यांचा महिन्याचा कौटुंबिक खर्च याविषयी माहितीचे संकलन करून विश्लेषण करण्यात आले आहे.

**वय :** प्रस्तुत संशोधनात एकूण प्रतिसादांपैकी ६२.७ टक्के महिला कामगार ३१ ते ३५ या वयोगटातील आढळतात. तर सगळ्यात कमी स्वीपर या पदावर काम करणाऱ्या ३.९ टक्के महिला या २६-३० या वयोगटातील दिसून येतात.

**वैवाहिक स्थिती :** पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांचा विचार केला असता विवाहित महिला कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ६८.५० टक्के इतके आहे. तर अविवाहित महिला कामगारांचे प्रमाण १९.४४ तर सर्वात कमी विधवा महिला कामगारांचे प्रमाण असून ते १२.०६ टक्के इतके आहे. म्हणजे बहुतांश महिला कामगार या विवाहित आहेत.

**शैक्षणिक पात्रता :** ज्या महिला कामगारांची शैक्षणिक पातळी जास्त (उच्च) आहे. त्या महिला प्रतिष्ठित पदावर कार्य करीत आहेत. उदा. सुपरवायझर पदावर काम करणाऱ्या एकूण महिला कामगारांपैकी २४.४४ टक्के महिला या पदवीधर असून ६.६७ टक्के महिलांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. वर्कर या पदावर काम करणाऱ्या एकूण महिला कामगारांपैकी ३२.३५ टक्के महिला कामगारांची माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. तर हेच प्रमाण क्लार्क आणि रिसेप्शनिस्ट, स्वीपर या पदावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या बाबतीत आढळते. यावरून अल्पशिक्षित महिला या कष्टाच्या किंवा सामाजिकदृष्ट्या दुय्यम समजल्या जाणाऱ्या पदावर कार्यरत असल्याचे निदर्शनास येते.

**कामाचे स्वरूप :** औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांच्या कामाचे स्वरूप हे हंगामी (तात्पुरते) किंवा कायम स्वरूपाचे आढळते. एकूण २१६ महिला कामगारांपैकी १६.७ टक्के महिला या कायमस्वरूपी कार्यरत आहेत. तर ८३.३ टक्के महिला वा तात्पुरत्या स्वरूपात कार्य करतात.

**नोकरी करण्याचे कारण :** औद्योगिक क्षेत्रातील एकूण २१६ महिला कामगारांपैकी ७६.४ टक्के महिला आर्थिक गरज म्हणून काम करतात. तर ६८.५ टक्के महिला स्वतःच्या स्वावलंबनासाठी काम करतात. याचा अर्थ महिला आवड म्हणून नोकरी न करता आर्थिक गरज व स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारत स्वावलंबन म्हणून नोकरी करताना दिसतात.

**महिला कामगारांचे मासिक उत्पन्न :** औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत महिला कामगारांच्या मासिक उत्पन्नांवरून त्यांची आर्थिक स्थिती समजते. एकूण २१६ महिला कामगारांपैकी ४ महिला कामगारांचे मासिक उत्पन्न १००० ते ५००० रुपये इतके आहे. १३८ महिला कामागारांचे मासिक उत्पन्न ५००१ ते १०००० रुपये इतके आहे. तर ६७ महिला कामगारांचे मासिक उत्पन्न १०००१ ते १५००० रुपये इतके आहे. तसेच ७ महिला कामगारांचे मासिक उत्पन्न १५००० रुपयांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच बहुतांशी महिला कामगारांचे मासिक उत्पन्न ५००१ ते १०००० रुपये इतके आहे. म्हणजेच सर्व सामान्य वेतनावर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण ६३.९ टक्के सगळ्यात जास्त आहे.

**महिला कामगारांची पैशाची बचत व बचतीचा प्रकार :** महिलांचे उत्पन्न व कौटुंबिक खर्च यांचा ताळमेळ घालत असताना बऱ्याच महिला कामगार बचत करताना आढळून आल्या. महिला कामगारांचे मासिक पगारातील पैशाची बचत करण्याचे प्रमाण हे बचत न करणाऱ्यांपेक्षा खूपच जास्त आहे. बचत करणाऱ्यांमध्ये बँक व भिशीमध्ये मोठ्या प्रमाणात बचत करतात तर पोस्ट ऑफिस व विमामध्ये बचतीचे प्रमाण तुलनेने खूपच कमी आहे.

महिन्याचा कौटुंबिक खर्च प्रस्तुत संशोधनातील २१६ महिला कामगारांपैकी १३१ महिला कामगारांचा (महिला कौटुंबिक खर्च रु. ५००० ते १०००० इतका आहे. एकूण कामगारांपैकी फक्त १० महिला कामगारांचा कौटुंबिक खर्च १५,००० पेक्षा जास्त असल्याचे दिसते. म्हणजेच बहुतांशी महिला कामगारांच्या महिन्याचा कौटुंबिक खर्च हा ५००० ते १०००० रुपये इतका आहे.

**निष्कर्ष :**

१. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या बहुतेक महिला या विवाहित असून त्या ३१ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या आहेत.
२. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कायमस्वरूपी महिला कामगारांचे प्रमाण अतिशय कमी आहे.
३. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील बहुतेक महिला कामगार या विभक्त कुटुंबात राहतात.
४. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील जवळ-जवळ सर्वच महिला कामगारांचा कामाचा कालावधी हा १० तासांपेक्षा कमी असून त्या दिवसपाळीमध्ये काम करतात.
५. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील बहुतांशी महिला कामगारांच्या युनिटमध्ये आरोग्य विमा योजना, आरोग्य तपासणी, वैद्यकीय भत्ता यासारख्या सुविधा पुरविल्या जातात.
६. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील बहुतांशी महिला कामगार या आर्थिक गरज असल्यामुळे स्वतःच्या स्वावलंबनासाठी नोकरी करतात.
७. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील बहुतांशी महिला कामगारांना कौटुंबिक आर्थिक नियोजनाची सवय असल्यामुळे पगारातून त्या पैशाची बचत करतात.
८. बहुतांशी महिला कामगार या महिन्याच्या कौटुंबिक खर्चामुळे, त्यांना मिळणारे वेतन व इतर भत्ते याबद्दल असमाधानी आहेत.
९. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांच्या मुलांसाठी बहुतांशी पाळणाघरची सोय आहे.
१०. कमी शिक्षित महिला कामगार या जास्त असून त्या कमी दर्जाचे काम

करताना दिसतात. तर उच्च शिक्षित महिला उच्च दर्जाचे काम करतात.

**शिफारशी व उपाययोजना :**

१. पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांना कंपनीने ठराविक कालावधीनंतर कायम करून नोकरीची सुरक्षितता द्यावी.
२. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील काम करणाऱ्या महिला कामगारांना शक्यतो दिवसपाळीमध्ये काम द्यावे व स्वतंत्र विश्रामगृहाची सोय करावी. त्यामध्ये उपहारगृह स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय करावी.
३. महिला कामगारांच्या लहान मुलांसाठी कंपनीने सर्व सोयीनीयुक्त अशा पाळणागृहाची सोय करावी.
४. पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांना कंपनीकडून नियमित वेतनवाढ, बोनस द्यावा. त्याबरोबर भविष्यनिर्वाहनिधीचीही सोय करावी.
५. ज्या वेगाने महागाई वाढत आहे त्या अनुषंगाने पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांचे वेतन वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी कंपन्यांनी महिला कामगारांची वेतन निश्चिती केली पाहिजे.
६. पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील कंपनी व्यवस्थापनाने कुशल व अकुशल महिला कामगारांसाठी विविध प्रकारची प्रशिक्षणे आयोजित करावीत.
७. शासनामार्फत महिला कामगारांसाठी कमी व्याजदराने आर्थिक पुरवठा करून त्यांचे सबलीकरण करावे.
८. पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये कार्यरत असणाऱ्या महिला संघटनांनी महिला कामगारांना येणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन करावे व समस्याचे निराकरण करावे.

औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा व्हावी, यासाठी कारखान्यामार्फत, शासनामार्फत, कामगार संघटना, सामाजिक संघटना यांनी योग्य ती पावले उचलून, अनेक कायदेशीर तरतुदी करून त्यांची योग्य ती अंमलबजावणी करून कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक समस्या दूर करण्याचा प्रयत्न करावा. कारण देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी स्त्रीयांचा सहभाग देखील तितकाच महत्त्वाचा ठरतो.

**संदर्भ सूची**

१. शर्मा विरेंद्र प्रकाश (२००४): भारतीय समाज मुद्दे और समस्याएँ', पंचशिल प्रकाशन, जयपूर, प्रथम आवृत्ती, पृ. ५०
२. शर्मा कविता (२०१२) 'स्त्री विकास की ऐतिहासिक रूपरेखा', रजन प्रकाशन, नई दिल्ली, पृ. १९
३. लेफ्टनंट बोर्डे, खडसे सुनिता, खडसे केशव सतीश (२०१०) : 'ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया' शुभ पब्लिकेशन, पुणे, पृ. ३४.